प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांचे कार्यालय

गडचिरोली न्यायीक जिल्हयाचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या सफाईगार पदाचे भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांकरीता

- सुचना -

१. सफाईगार पदाकरीता पात्र उमेदवारांची **''चापल्य व साफसफाई चाचणी परिक्षा'' जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे दिनांक १३/१२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजतापासून** घेण्यात येईल.

२. चापल्य व साफसफाई चाचणी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या अर्जदारांना डाकेद्वारे ओळखपत्र पाठविण्यात आले आहेत.

३. चापल्य व साफसफाई चाचणी परिक्षेकरीता पात्र अर्जदारांना दिनांक १२/१२/२०२६ पर्यंत डाकेद्वारे ओळखपत्र प्राप्त न झाल्यास अशा उमेदवारांना चापल्य व साफसफाई चाचणी परिक्षेच्या दिवशी अर्जदाराचे विनंतीवरुन ओळखपत्र देण्यात येईल. अशा अर्जदारांनी ओळख पटविण्याकरीता सोबत स्वत:चे पासपोर्ट साईजचा एक फोटो तसेच आधार कार्ड किंवा पॅन कार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना सोबत घेवुन यावा.

४. चापल्य व साफसफाई चाचणी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांनी चापल्य व साफसफाई परिक्षेकरीता दिनांक १३/१२/२०२६ रोजी चाचणी परिक्षेच्या नियोजीत वेळेच्या ४० मिनीटांपुर्वी जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे उपस्थित राहावे.

५. उमेदवाराने चापल्य व साफसफाई चाचणी परिक्षेला येतांना कार्यालयाने दिलेले ओळखपत्र तसेच ओळख पटविण्याकरीता आधार कार्ड/पॅन कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना यापैकी कोणतेही मूळ दस्ताऐवज आणावे. अन्यथा आपले नावाचा विचार केल्या जाणार नाही.

६. उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायीक विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांचेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

७. जिल्हा न्यायालय, गडचिरोलीचे सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर वेळोवेळी प्रकाशित करण्यात येणाऱ्या सुचना उमेदवारांना बंधनकारक राहतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

23/11/26

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.